**विकास योजना वसई-विरार उपप्रदेश**

**मंजूर विकास योजनेतील आ.क्र.५३१अ-"डंम्पिंग ग्राऊंड" या आरक्षणातील स.क्र.३०ब या जमिनीचे भागशा: क्षेत्र वगळून "हरित विभागात" समाविष्ठ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(२) अन्वयेची अधिसुचना..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. टिपीएस-१२२२/२१३८/प्र.क्र.३२/२३/नवि-१२**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक:-५ जुलै, २०२४.**

**शासन निर्णय** :- सोबतची शासकीय अधिसुचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

**(संदीप जोशी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत -:**

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) मा.संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. उपसचिव तथा उप संचालक (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य-पुणे.
२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.
३) आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार.
४) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
५) सहाय्यक संचालक, नगर रचना, पालघर शाखा, पालघर.

(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत अधिसुचनेच्या अनुषंगाने प्रसिध्द करावयाच्या भाग नकाशाच्या ०७ प्रती विहित मार्गाने अधिप्रमाणित करण्याकरिता सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेमार्फत शासनास सत्वर सादर कराव्यात.)

६) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्र कोकण विभागीय पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई, सहाय्यक संचालक, नगर रचना, पालघर शाखा व आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, विरार यांना पाठवाव्यात.)

७) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर अधिसूचना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-सदर अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

९) निवडनस्ती (कार्यासन-नवि-१२)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :-५ जुलै, २०२४**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**
**क्रमांक-टिपीएस-१२२२/२१३८/प्र.क्र.३२/२३/नवि-१२,**

ज्याअर्थी, वसई-विरार उपप्रदेशाची विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे ) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस/१२०५/१५४८/प्र.क्र.२३४/०५/नवि-१२, दिनांक ९ फेब्रुवारी, २००७ अन्वये भागश: मंजूर झाली असून ती दिनांक १५/०३/२००७ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन नगर विकास विभागाकडील दिनांक १३/०३/२००९, १९/०९/२००९, ०५/१०/२००९, ०४/०४/२०१२, १६/०८/२०१४, २७/०२/२०१५ व दिनांक १०/०८/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर करण्यात आली आहे (यापुढे जिचा एकत्रित उल्लेख "उक्त मंजूर विकास योजना "असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.२३०६/४१२/प्र.क्र.-२२३/२००६/नवि-२४, दिनांक ३ जुलै २००९ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली असून नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-१२०९/२४२९/प्र.क्र.२६२/नवि-१२, दिनांक ७ जुलै २०१० नुसार महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून अधिकार प्रदान केलेले आहे. तसेच शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतुन वगललेल्या २१ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोकडे असलेले अधिकार दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ पासून वसई-विरार शहर महानगरपालिकेला प्रदान केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ.गोखिवरे, ता.वसई येथील स.क्र.३०ब (पै), क्षेत्र सुमारे ५९८५.०० चौ.मी. ही जमीन भागश: आ.क्र.५३१अ "डंम्पिंग ग्राऊंड" या आरक्षणामध्ये समाविष्ट आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त आरक्षण"असा करण्यात आला आहे.);

आणि ज्याअर्थी, वसई-विरार शहर महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन स.क्र.३०ब(पै) ही जमीन भागश: (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन" असा करण्यात आला आला आहे) उक्त आरक्षणामधून वगळून त्याखालील क्षेत्र हरित विभागात समाविष्ट करण्याचा (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल प्रस्ताव" असा करण्यात आला आहे) प्रस्ताव दिनांक २८/११/२०२३ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरीकरीता सादर केला आहे;

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32. सत्यमेव जयते

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल प्रस्ताव मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय दि.२०/४/२०१६ नुसार आता स.क्र.३०ब च्या जमिन धारकांनी त्यांचे मालकीच्या क्षेत्रासाठी प्रचलित वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार येणा-या जमिन मुल्याच्या ५% दराने येणा-या रक्कमेपैकी शासन देय असलेल्या ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये ४,२८,०००/- सहाय्यक संचालक नगर रचना शाखा कार्यालय पालघर यांचेमार्फत शासकीय कोषागारात चलन क्र. MH०१७४०५३८६२०२३२४P, दिनांक १५/३/२०२४ (डीफेस क्र.०००९२५६७३२२०२३२४, दिनांक १८/३/२०२४) रोजी आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली रक्कम रुपये ४,२८,०००/- वसई-विरार शहर महानगरपालिका यांचेकडे पावती क्र.१२२५७३, दि.१३/०३/२०२४ रोजी भरणा केला आहे;

त्याअर्थी,आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन उक्त फेरबदल प्रस्ताव मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

**नोंद**

*"विकास योजना भाग नकाशावर दर्शविल्याप्रमाणे मौ.गोखिवरे, ता.वसई येथील स.क्र.३०ब, क्षेत्र सुमारे ५९८५.०० चौ.मी. ही जमीन वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास योजनेनुसारच्या आ.क्र.५३१-अ "डंम्पिंग ग्राऊंड" या आरक्षणातून वगळून "हरित विभागात" समाविष्ट करण्यात येत आहे."*

**०२.** सदरच्या मंजूर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

**०३.** उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.

२) आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, विरार.

३) सहाय्यक संचालक नगर रचना, पालघर शाखा, जि. पालघर.

**०४.** सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra. gov.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

**(संदीप जोशी)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई - 32.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPENT DEPARTMENT**
**4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai-400032.**
**Dated :- 5th July, 2024.**

# NOTIFICATION

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966,**
**No. TPS-1222/2138/CR-32/23/UD-12,**

Whereas, the Development Plan for Vasai Virar sub region (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned partly by the Government in Urban Development Department under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1205/1548/C.R.234/05/UD-12, dated 9th February, 2007 and has came into force with effect from 15/03/2007 and the Excluded part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(1) of the said Act, vide Notification dated 13/03/2009, 19/09/2009, 05/10/2009, 04/04/2012, 16/08/2014, 27/02/2015 and dated 10/08/2018 (hereinafter jointly referred to as "the said Sanctioned Development Plan");

And whereas, Vasai-Virar City Municipal Corporation has come into existence under Government in Urban Development Department's Notification No.2306/412/CR-223/2006/UD-24, dated 3rd July 2009 and Urban Development Department Notification No.TPS-1209/ 2429/C.R.262/UD-12, dated 7 th July 2010 has empowered to municipal corporation as a Planning Authority. The Government powers conferred by CIDCO as a Special Planning Authority for 21 villages excluded from Vasai-Virar City Municipal Corporation limits have been transferred to Vasai-Virar City Municipal Corporation with effect from 21st February 2015;

And whereas, in the said Development Plan, an area admeasuring about 5985.00 sq.mt. from the land bearing S. No. 30b(pt) of village Gokhivare, Tal. Vasai is included in "Dumping Ground" Reservation as Site No. 531A (hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, Vasai-Virar City Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Municipal Corporation "), after following the legal procedure under sub-section (1) of section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to delete the said Reservation on the land bearing S.No. 30b(pt) of village Gokhivare (hereinafter referred to as "the said lands") and to include the same in Green Zone vide letter dated 28/11/2023 (hereinafter referred to as "the said Modification") for final sanction to Government;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the said Modification;

And whereas, as per Government Resolution dated 20/4/2016 the owner of the land bearing S.No. 30b has deposited the premium amount of Rs.4,28,000/- towards 50% share payble to Government in the Government treasury through

Assistant Director of Town Planning, Palghar Branch vide challan No.MH017405386202324P, dated 15/03/2024 (Defacement No. 0009256732202324, dated 18/03/2024) and deposited the premium amount Rs. 4,28,000/- towards 50% share payble to Planning Authority in the office of Vasai-Virar City Municipal Corporation, vide Receipt No.122573, dated 13/03/2024 out of the total premium amount of the rate of 5% land value as per the Prescribed in the current Annual Statement of Rate;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (2) of section 37 of the said Act, the State Government hereby sanctions the said Modification as described below:-

"In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted."

**viz. :-**

**<u>ENTRY</u>**

*"In the Development Plan of Vasai Virar sub region, the land bearing S. No. 30b (area 5985.00 Sq.Mt.) of village Gokhivare, Tal. Vasai is deleted from the Site No. 531A "Dumping Ground" and land so deleted is included in "Green Zone" as shown on the part plan of the Development plan."*

**02.** The date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazette is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**03.** The part plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

i) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

ii) The Municipal Commissioner, Vasai-Virar City Municipal Corporation, Virar.

iii) The Assistant Director of Town Planning ,Palghar, Dist. Palghar.

**04.** This notification shall also be made available on the Government Website at <u>www.maharashtra.gov.in</u>

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**(Sandeep Joshi)**
**Section Officer to the Government**

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.